प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

पुरातन काळापासून कथा हा वाङ्मय प्रकार सुरु झाला.स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कथा विविध अंगाने बहरली. मध्यमवर्गीयांच्या जीवनातील सुखदु:खाचे चित्रण करणारा हा एक महत्वाचा प्रवाह आहे. त्यात अनेक लेखक, लेखिकांचा उल्लेख करता येतो. त्यामध्ये शैलजा राजे या एक महत्वाच्या लेखिका आहेत. त्यांच्या कथा लेखनाची वैशिष्ट्ये 'कृतज्ञ' व 'जडावाचे मंगळसूत्र' या त्यांच्या कथासंग्रहाच्या आधारे पहात असताना पहिल्या प्रकरणात 'मराठी कथेचा उदय व विकास' याचा अभ्यास केला. हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणूक' कालखंडानंतर लघुकथेचा कालखंड पाहिला. त्यातील कथा स्वभावप्रधान आहे. व्यक्तिरेखाटन, व्यक्तिमन याला तिने प्राधान्य दिले. या कालखंडात लघुकथेबरोबर 'रुपककथा' लोकप्रिय झाली. वामन चोरघडे, दिवाकर कृष्ण, कुसमावती देशपांडे यांच्या कथांमध्ये नवकथेची बीजे दिसून येतात.

य.गो. जोशींनी तंत्रवाद झुगारुन कथा लिहण्याचा प्रयत्न केला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांना नवकथा संबोधले गेले. त्यांनी आपल्या कथेत मनोविश्लेषणाला प्राधान्य दिले तसेच त्यांनी आपआपल्या परीने कथेच्या अभिव्यक्तीत नवता आणली.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण कथेची क्षितीजं विस्तारण्यास सुरुवात झाली. त्याच दरम्यान स्त्री लेखकांनी स्त्रियांच्या बाबतीत त्यांची सुखदु:खे नेटाने मांडली मध्यमवर्गीयांच्या जीवनाभोवती फिरणा-या या कथांमध्ये आपआपल्या परीने कथेच्या अभिव्यक्तीत नवता आणली.

१९६० नंतर कालखंडावर विशेष ठसा उमटविणारे लेखक म्हणजे जी.ए. कुलकर्णी होत. त्यांची कथा मानवी अस्तित्वाचा शोध घेणारी ठरते. १९६० नंतर कथेच्या बाबतीत विचार करता असे दिसून येते त्यात संख्यात्मक वाढ खूप झाली. रंजनपर, स्वप्निल कथांची निर्मिती हे तिचे प्रधान स्वरुप आहे. त्याचबरोबर अनेक लेखकांनी वास्तववादी कथा लेखनही केले हा वास्तवाचा शोध अस्तित्ववाद नव्या वादांच्या वैशिष्ट्यांनी नटलेला आहे.

१९६० नंतर विविध वाङ्मय प्रकारात लेखन करुन माणसाचा शोध घेणा-या लेखिका शैलजा राजे दुर्लक्षित राहिल्या. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांचे साहित्य निश्चितच दखल घेण्याजोगे आहे. मध्यमवर्गीय स्त्रियांचे जीवन आपल्या विविध प्रकारच्या वाङ्मयप्रकारातून त्यांनी उभे केले. मध्यम वर्गीय स्त्री जीवनातील समस्या आपल्या साहित्यातून विशेषत: कथेतून त्यांनी मांडल्या आहेत. विविध प्रकारे लेखन करणाऱ्या अशा या लेखिकेच्या साहित्याचा अभ्यास या प्रबंधिकेच्या निमित्ताने केला आहे.

**प्रकरण दुसरे-**

'कृतज्ञ' या शैलजा राजे यांच्या कथासंग्रहाचा वाङ्मयीन, सामाजिक संदर्भातून अभ्यास करताना प्रारंभी त्यांचा वाङ्मयीन परिचय करुन घेताना त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, स्वभावविशेष तसेच त्यांचे लेखन, श्रुतिका, कथा, कादंबरी, ललित गद्य, वाङ्मय, मासिकातील लेख, त्यांना मिळालेले पुरस्कार, सामाजिक शैक्षणिक कार्य, अध्यक्षपदे या घटकांचा विचार केला. १९६२ पासून त्यांनी लेखनाला सुरुवात केली. विविध साहित्यप्रकार हाताळून त्यांनी विपुल लेखन केले.

मध्यमवर्गीय स्त्रियांची दु:खे हाच त्यांच्या कथेचा प्रमुख विषय आहे. वास्तव आणि मनोविश्लेषणात्मक कथा लिहण्यात त्यांना अधिक रस आहे. किशोर, तरुण, प्रौढ, वृध्द अशा विविध वयोगटातील स्त्री-पुरुषांचा जीवनपट त्यांनी आपल्या कथांतून उभा केला आहे.

**प्रकरण तिसरे-**

'जडावाचे मंगळसूत्र' या शैलजा राजे यांच्या कथासंग्रहाचा वाङ्मयीन, सामाजिक संदर्भातून अभ्यास करताना काहीशा गूढ वाटणा-या तर काही वाचकाला कोड्यात टाकणा-या कथाही शैलजा राजे यांनी लिहल्या आहेत. त्यांच्या अद्भुतरम्य कथा वाचकाला एका वेगळ्या विश्वाचे दर्शन घडवितात.

शैलजा राजे यांच्या कथा लेखनाचा विचार पुढील आशय सूत्राच्या अधारे केला आहे.

१) मानवी वर्तनामागील अतर्क्यता.

२) अद्भुतरम्य कथा.

३) मानवी संबधाचे अनोखे दर्शन.

४) कौटुंबिक कथा.

५) स्त्रीच्या बध्दजीवनात परिस्थिती या घटकाचे महत्व.

६) स्त्री स्वभावाचे आगळे दर्शन.

७) किशोरावस्थेतील मानसिकता.

८) वृध्द स्त्री-पुरुषांच्या स्वभाव-जीवनावर आधारित कथा.

पात्र चित्रणाचा विचार करताना आशय-सूत्रानुसार प्रत्येक कथेतून येणा-या पात्रांची ठळक वैशिष्ट्ये मांडली आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री शांत, संयमी, सहनशील, सरळ, स्वतंत्र विचारांची विशिष्ट तत्त्वे घेऊन जगणारी, परंपरावादी, जबाबदारीची जाणीव असलेली, समजंस, सुसंस्कृत, प्रामाणिकपणे प्रेम करणारी, इत्यादी वैशिष्ट्ये असलेली. तर पुरुष निर्दयी, हट्टी, हेकट, वासनांध पुरुषी वासना जोपासणारा, वर्चस्व गाजविणारा, आळशी इत्यादी वैशिष्ट्ये असलेला दिसतो.

यानंतर विविध भावबंध उलगडणारे मनोविश्लेषण, प्रत्ययकारी संघर्ष, वाचकांची उत्सुकता वाढविणारी शीर्षके, कथानकाला गती देणारे व मनातील भाव व्यक्त करणारे संवाद, कथेचा आरंभ व शेवट या अभिव्यक्ती वैशिष्ट्यांचा विचार केला आहे. असे असले तरी मध्यमवर्गीय स्त्री-जीवनाचे दर्शन, नैतिकमूल्ये जपणा-या स्त्रिया, सर्व पात्रे स्त्रीत्वाच्या धाग्याने बांधलेली, जीवनशोधाबरोबरच कलात्मक रहस्याचा शोध इत्यादी वैशिष्ट्यांमुळे शैलजा राजे यांच्या कथांची गुणवत्ता वाढली आहे. मध्यमवर्गीय स्त्री जीवनापुरतेच त्यांच्या कथेचे विषय मर्यादित नसून नानाविध आहेत. त्यांनी व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला आहे. शैलजा राजे यांनी समाजामध्ये घडणा-या घडामोडी या आपल्या कथांचे विषय बनविले आहेत.

शैलजा राजे यांनी आपल्या कथेतील व्यक्तिरेखा मोठ्या ताकदीने वाचकांसमोर मांडलेल्या आहेत. त्यांच्या कथेतील मोजकेच व परिणामकारक प्रसंग वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करुन जातात. व्यक्तींच्या जीवनात निर्माण झालेले प्रसंग हे केवळ त्यांच्या पुरतेच मर्यादित नसून त्यांची व्याप्ती खूप मोठी आहे. समाजातील दु:ख त्यांच्या व्यक्तिरेखातून आपल्या समोर त्या प्रकट करताना दिसतात.

**प्रकरण चौथे-**

अंतर्मुखता आणि चिंतनशीलता हा शैलजा राजेंच्या वृत्तीचा व लेखनाचा एक फार मोठा दुर्मिळ गुण आहे. 'कृतज्ञ' व 'जडावाचे मंगळसूत्र' दोन्ही कथा संग्रह नायिकाप्रधान असून ते प्रेमविषयक आहेत. पुरुषांचा नादानपणा 'भोगवटा' कथेत दिसून येतो. या कथेतील नायक देशपांडे वकील विद्याकडे फक्त शरीरसुखाची अपेक्षा करतो. ते सुख इच्छेप्रमाणे भोगतो. पण लग्न करण्यास नकार देतो. या नायिकेच्या जीवनाशी समरस होऊन ही कथा शैलजा राजेंनी लिहिली आहे. पूर्ती या कथेत मुकुंद शांताचा शेवटपर्यंत विचार करीत नाही. पण शांता शेवटपर्यंत मुकुंदच्या प्रेमाच्या दोन शब्दांसाठी आसुसलेली असते. ज्यावेळी मुकुंदला आपली चूक लक्षात येते त्यावेळी तो म्हणतो 'शांता, मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही' हे शब्द कानी पडतात त्यावेळी शांतानं जगाचा निरोप घेतलेला असतो.

शैलजा राजेंना कलावंतीणी विषयी असणारा आदर, कुतूहल आणि जिव्हाळा यातून 'यादों की बारात', 'कहानी कनातीची' या कथांचा जन्म झाला. कलावंतीणीच्या प्रेमातील निष्ठा लेखिकेला, वाचकाला अस्वस्थ करते. कलावंतीणी शरीराने मनाने कितीही शुध्द असल्यातरी त्यांना समाजातील पुरुष आपली पत्नी म्हणून स्वीकारत नाहीत. शकुंतला तमासगिरीण विश्वास बरोबर लग्न करुन त्याच्या घरी येते. शकुंतलाला मुलं होतात. विश्वास ऑपरेशन करतो. पण चाळीशीत पुन्हा शकुंतलाला दिवस जातात. त्यावेळी विश्वास तिच्यावर संशय घेऊन हाकलून देतो. या

कलावंतीणीच्या समस्या (तमासगीर, कोल्हाटी स्त्रियांच्या समस्या) हा सामाजिक विषय या कथेतून लेखिकेने हाताळला आहे.

स्त्रीच्या सौंदर्यापेक्षा गुणांना महत्व देऊन 'एरंडी' ही कथा शैलजा राजेंनी लिहली आहे. कुरुप असूनही ध्रुपदाचा संसार सुखानं चाललेला असतो. याचे लेखिकेला कुतूहल वाटते. पण सौंदर्यापेक्षा स्त्रीच्या अंगी असलेल्या गुणांना महत्व दयावे हा सामाजिक संदेश या कथेतून लेखिका देताना दिसते. एकूणच समाज प्रबोधनाच्या उदात्त हेतूने त्यांनी आपले लेखन केले आहे. शैलजा राजे यांच्याकडे स्त्रियांविषयी आदर, तळमळ, कळकळ तरुणांच्याबद्दल मनात विलक्षण प्रेम आहे. त्यामुळे वरील सर्व विषय त्यांनी आपल्या लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भाषाशैली- शैली हा साहित्याचा पोषाख होय, पोषाखावरुन माणूस जसा ओळखला जातो तसा शैलीवरून लेखक ओळखला जातो. "Style is the man" प्रत्येक लेखकाची विशिष्ट शैली असते. ती शैली पुढे त्यांचे अंगभूत वैशिष्ट्य बनून राहते.सावलीसारखी त्याच्याबरोबर राहते. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा भाग बनते. म्हणून ब्युफोने 'शैली म्हणजे लेखकच' असे म्हटले आहे. शैलीतून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अंदाज बांधता येतो. म्हणूनच "Style is the man" हे वाक्य शैलजा राजे यांच्या लेखना संदर्भात योग्यच वाटते.

समाजातील विविध रंग वेचताना, समाजातील सुख दु:खाचा आविष्कार करताना ज्या एका विशिष्ट पध्दतीचा स्वीकार करुन लेखन केले जाते. त्याला शैली म्हणतात. साध्या साध्या आशयाला नटवून सादर करण्याचे कार्य शैली करत असते. ही शैली लेखकपरत्वे भिन्न भिन्न असते. लेखकाची जडणघडण, संस्कार, शिक्षण, वाङ्मयाची जाण, त्याला आलेले अनुभव, त्याची ध्येये, त्याची जीवनमूल्ये, लेखनाचा उद्देश, त्याचा आर्थिक स्तर अशा अनेक घटकांचा परिणाम शैलीवर होत असतो.

शैलजा राजेंची भाषाशैली ही सुबोध, ओघवती ,अर्थवाही व रसपूर्ण आहे. प्रसंगविशेषी कविता ही मधून मधून पेरण्याचा त्यांना छंद आहे.

गुड्डी कथेतील नायिका निशा अरविंदला उद्देशून म्हणते,

" तू असशी रे किती छान, हरपले भान,

प्रेमिका मी बनले, आली रे याची मजला जाण !"

कथेतील वाक्यरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. या त्यांच्या तेजस्वी ओघवत्या शैलीमुळे त्यांची व्यक्तिचित्रणे, कथेतील संघर्ष अधिक प्रभावी वाटतात.

'कृतज्ञ' व 'जडावाचे मंगळसूत्र' या कथा संग्रहातील कथांची सुरुवात, मध्य, व शेवट यांची गुंफण योग्यरीतीने शैलजा राजे यांनी केलेली आहे. वाचकाला शेवटपर्यंत गुंतवून ठेवण्याचे

सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे. एकूण त्यांच्या कथेमध्ये आधुनिक विचारसरणी बरोबरच पारंपरिक विचारसरणीला सुध्दा महत्वाचे स्थान दिलेले आढळते. एकंदरीत त्यांची कथा स्त्रियांची दु:खं, वेदना मांडण्यात यशस्वी ठरलेली आहे.

वाचकांची उत्सुकता वाढविणारी शीर्षके, आशयास साजेशी, कल्पकतेचा आविष्कार करणारी भाषा, कथानकास गती देणारे, मनातील भाव व्यक्त करणारे संवाद, निवेदनपध्दतीची विविधता ही रुपवैशिष्ट्ये त्यांच्या कथेची आहेत.

असे असले तरी मध्यमवर्गीय स्त्री जीवनाचे विविध पातळयांवरील दर्शन नीतिवादी जीवनविषयक दृष्टिकोन या गुण वैशिष्ट्यांमुळे कथांची गुणवत्ता वाढली आहे. 'कृतज्ञ' व 'जडावाचे मंगळसूत्र' या शैलजा राजे यांच्या कथा संग्रहाच्या आधारे आपणास काही निरीक्षणे नोंदविता येतात.

१) मानवी वर्तन व अज्ञान, स्त्रीचे शोषण, स्त्रीची विटंबना स्त्री स्वभावाचे विविध पैलू व समाजातील स्त्रियांचे स्थान ही आशयसूत्रे शैलजा राजे यांच्या कथा लेखनाची आहेत.

२) मध्यमवर्गीय बहुजनसमाजातील सुशिक्षित स्त्रियांच्या जीवनातील अडचणी मानवी संबधाचे अनोखे दर्शन, स्वभाव व व्यक्तिचित्रे, विविध भावबंध, जीवनातील संघर्ष, शहरी, ग्रामीण जीवनाचे वास्तववादी दर्शन या कथासंग्रहातून होते.

३) मराठी भाषेतील सुंदर अलंकार, वाक्प्रचार, म्हणी यांचा केलेला यथायोग्य (चपखल) उपयोग, मानवी जीवनावरील उत्कट प्रेम, करुणा, कथेला वजन प्राप्त करुन देतात.

४) आपल्या देशातील स्त्रिया सुशिक्षित असून सुध्दा समाजात सुरक्षित नाहीत स्त्रियांवरील अत्याचार, अन्याय, समाजाकडून होणारी तिची पिळवणूक, गांजवणूक याचे दर्शन त्यांच्या कथांतून घडते.

५) सर्वसाधारण स्त्री बरोबर तमासगिर स्त्रीचे प्रेम तिची निष्ठा, समाजाकडून मिळणारी वाईट वागणूक तरीही आपल्या मुलांवर सुसंस्कार करणारी स्त्री व तिची जिद्दीने जीवन जगण्याची दुर्दम्य आशा याचे दर्शन घडते.

६) सर्वच पुरुष वाईट नसतात. काही आपल्या पत्नीवर प्रेम करणारे, तिला जपणारे, तिच्याशी एकनिष्ठ राहणारे, तिच्या सुख दु:खात समरस होणारे, प्रेमळ, तिच्यावर विश्वास ठेवणारे मुलाबाळात रमणारे, कुटुंबवत्सल असतात याचे ही दर्शन कथांतून घडते.

७) स्त्री मनाच्या वेदना, नव-याने फसवल्यामुळे होणारी तिची ससेहोलपट याचे वर्णन, उत्सुकता वाढवणारी शीर्षके यामुळे कथा उत्कंठा वाढवितात. प्रत्ययकारी भाषा, कथेतील पात्रांच्या मनातील

भाव, स्त्री मनाची स्पंदने, संवाद, उत्कंठापूर्ण प्रारंभ व परिणामकारक शेवट, चिंतनशीलता ही महत्वाची रुपवैशिष्ट्ये या कथा लेखनाची आहेत.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की शैलजा राजे यांची कथा वेगळी वाट चोखाळणारी आहे. या कथांतील स्त्रिया आपला मार्ग आपण शोधतात. विविध अनुभवांना त्यांना सामोरे जावे लागते. त्यातून सामान्यपणे मध्यमवर्गीयांची जीवनाची आसक्ती त्यांचे भावविश्व, त्यांच्या मर्यादा येथे अधोरेखित झालेल्या आहेत.

जीवनशोधना बरोबरच कलात्मक रहस्यांचा शोध या वैशिष्ट्यांमुळे या कथांची गुणवत्ता वाढली आहे.

या सर्व भावविश्वाचे प्रभावी चित्रण करुन शैलजा राजे यांनी मराठी कथा विश्वात निश्चितपणे भर घातली आहे. त्यांच्या कथा वेगळ्या वाट चोखाळणा-या आहेत. त्यामुळे मराठी कथा वाङ्मयात त्यांना महत्वाचे स्थान आहे.